एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पोषण सुधारणा कार्यक्रम (ISSNIP-World Bank) **राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमासाठी निधी वितरीत करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१६/प्र.क्र.२५७/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० मार्च, २०१८

वाचा : - (१) केंद्र शासनाचे,महिला व बाल विकास विभाग,पत्र क्र.F.No.१०-१/२०१३-WBP, दिनांक १८ मार्च, २०१६

(२)) केंद्र शासनाचे, महिला व बाल विकास विभाग,पत्र क्र.WBP-२९/७/२०१६WBP, दिनांक २७ ,एप्रिल २०१७

(३) महिला व बाल विकास विभाग,शा.नि.क्र.एबावि-२०१६/प्र.क्र.२५७/का.६,दि.२८ फेब्रुवारी, २०१८

(४) आयुक्त तथा राज्य प्रकल्प संचालक,जागतिक बँक सहाय्यित एबाविसे बळकटीकरण व पोषण सुधारणा प्रकल्प महाराष्ट्र राज्य,नवी मुंबई यांचे पत्र क्रमांक एबाविसेयो/Issnip/२०१७-१८/३७, दिनांक २७ मार्च, २०१८

प्रस्तावना :- केंद्र शासनाने जागतिक बँकेच्या सहाय्याने अंमलात आणलेली एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पोषण सुधारणा प्रकल्प या योजनेची राज्यातील २० जिल्हयात ३१७ प्रकल्पात एकुण ६०१३२ अंगणवाडी केंद्रात अंमलबजावणी सुरु करण्यास दिनांक ३० एप्रिल २०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने जागतिक बँक प्रकल्प, एकात्मिक बाल विकास सेवा योजना बळकटीकरण व पोषण सुधारणा प्रकल्पाची पुनर्रचना मार्च-२०१६ मध्ये केलेली आहे. त्यानुसार पुर्वी केंद्र हिस्सा ९०% व राज्य हिस्सा १०% असे निधीचे प्रमाण होते. त्यामध्ये बदल करुन केंद्र हिस्सा ८८% व राज्य हिस्सा १२% असे निधीचे प्रमाण करण्यात आलेले आहे.तसेच पुर्वीच्या कार्यक्रमात देखिल बदल केलेला आहे

२. जागतिक बँक प्रकल्प (ISSNIP) अतंर्गत अंगणवाडी केंद्रात दरमहा ओटीभरण, अन्न प्राशन इ. Community Based Events आयोजित करण्यात येतात. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रुपये २५०/- इतकी रक्कम अंगणवाडी केंद्राना अनुज्ञेय आहे. **माहे जानेवारी-२०१८ ते मार्च -२०१८** या कालावधीत अंगणवाडीस्तरावर अंगणवाडी केंद्रात Community Based Events आयोजित करण्यात आलेले आहेत. सदर कार्यक्रम अंगणवाडीस्तरावर पार पाडण्यात आलेले असल्यामुळे त्यासाठी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- जागतिक बँक प्रकल्प (ISSNIP) अतंर्गत अंगणवाडी केंद्रात दरमहा ओटीभरण, अन्न प्राशन इ. Community Based Events आयोजित करण्यात येतात. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रुपये २५०/- इतकी रक्कम अंगणवाडी केंद्राना अनुज्ञेय आहे. **माहे जानेवारी-२०१८ ते मार्च -२०१८** या कालावधीत Community Based Events अंगणवाडीस्तरावर अंगणवाडी केंद्रात आयोजित करण्यात आलेले आहेत. सदर कार्यक्रम अंगणवाडीस्तरावर पार पाडण्यात आलेले आहे. तसेच (ILA) Incremental Learning Approch ३१७ प्रकल्पासाठी प्रती प्रकल्प ३०००/- प्रमाणे ३ मॉडयुलकरिता निधी वितरीत करणे, त्याचप्रमाणे २२०५ बीटसाठी रुपये ५००/- प्रमाणे प्रति मॉडयुलप्रमाणे ३ मॉडयुल करीता एकूण रुपये ४५७.२० लाख (रुपये चार कोटी सत्तावन्न लाख वीस हजार) इतका निधी खर्च करण्यास आयुक्त तथा राज्य प्रकल्प संचालक, जागतिक बँक सहाय्यित एबाविसे बळकटीकरण व पोषण सुधारणा प्रकल्प महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना शासन मान्यता देत आहे.

३. आयुक्त तथा राज्य प्रकल्प संचालक, जागतिक बँक सहाय्यित एबाविसे बळकटीकरण व पोषण सुधारणा प्रकल्प महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी सदर निधी केंद्र हिस्सा ८८% व राज्य हिस्सा १२ % याप्रमाणात खर्च करावा.

४. या प्रयोजनासाठी होणारा केंद्र हिश्याचा खर्च मागणी क्र.एक्स-१, २२३६- पोषण आहार, (०६) (०६) जागतिक बँकेचे सहाय्य, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पोषण आहार सुधारणा प्रकल्प (केंद्र हिस्सा ८८%) (२२३६१८८३) ५०- इतर खर्च (रु.४०२.३३ लाख) व राज्य हिश्याचा खर्च मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, (०६) (०७) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पोषण आहार सुधारणा प्रकल्प (राज्य हिस्सा १२%) (२२३६१८९२) ५०- इतर खर्च (रु.५४.८७ लाख) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षी मंजूर व उपलब्ध असलेल्या आर्थिक तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११५२७४४२१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.03.31 23:13:47 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (महिला व बाल विकास)मंत्रालय,मुंबई
२) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
३) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) राज्य प्रकल्प संचालक,जागतिक बँक प्रकल्प,एकात्मिक बाल विकास सेवायोजना बळकटीकरण व पोषण सुधारणा प्रकल्प,नवी मुंबई
५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
६) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग.
७) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, (जिल्हा परिषद)
८) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण/नागरी/आदिवासी प्रकल्प)
९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र -१, मुंबई
१०) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई
११) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र -२, नागपूर
१२) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर
१३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४) कक्ष अधिकारी (का.४) महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
१५) वित्त विभाग,(व्यय-६) मंत्रालय, मुंबई
१६) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) निवड नस्ती (कार्यासन ६)